**कृपया प्रसिध्दीसाठी -** **24 जानेवारी 2013**

## जनसेवा बँकेच्या तीन शाखांचे एका आठवड्यात उद्‌घाटन

**मुंबई,गुरुवार:** ''सर्वत्र सहकार क्षेत्रामध्ये अडचणी येत असताना जनसेवा सहकारी बँक (बोरीवली) मात्र सातत्याने प्रगती करते आहे. ग्राहकसेवेसाठी बँक समर्पित असल्यानेच पहिल्याच दिवशी रु.2.25 कोटींच्या ठेवी नव्या शाखेत आल्या आहेत'', असे कौतुकोद्‌गार माजी पेट्रोलियम मंत्री श्री. राम नाईक यांनी काढले. बँकेच्या अंधेरी पश्चिम शाखेच्या उद्‌घाटन प्रसंगी ते बोलत होते.

सातत्याने ए ऑडीट वर्ग मिळविणा-या जनसेवा बँकेला यंदा तर ए + वर्ग मिळाला आहे. बँकेचा झपाट्याने विस्तार होत आहे. अंधेरी शाखेपाठोपाठ 25 जानेवारी रोजी गोरेगाव पश्चिम शाखेचे उद्‌घाटन होणार असून लगेचच 27 जानेवारीला मालाड शाखा नव्या मोठ्या जागेत स्थलांतरीत होत आहे. ही स्वागतार्ह बाब आहे असेही यावेळी श्री. राम नाईक म्हणाले.

अंधेरी रिक्रिएशन क्लबचे अध्यक्ष श्री. रतनचंद जैन, आमदार श्री. गोपाळ शेट्टी, उपमहापौर श्री. मोहन मिठबावकर, माजी उपमहापौर श्री. अरुण देव, नगरसेवक श्री. अमीत साटम, नगरसेवक मोहशीन हैदर, आदी मान्यवर तसेच श्री. भालचंद्र भांगे यांच्यासह बँकेचे सर्व संचालक यावेळी उपस्थित होते.

बँकेचे अध्यक्ष श्री. सुरेश करमरकर यांनी उपस्थितांचे स्वागत करुन बँकेचे ग्राहक बनण्याचे आवाहन केले, तर उपाध्यक्ष ॲड. जयप्रकाश मिश्रा यांनी सूत्रसंचालन केले.

**(महाव्यवस्थापक) करीता**